# प्रभुतरुण

| वर्ष ४७ | अंक १० | मुंबई | एप्रिल २०१४ | पाने ६ | किंमत रु. १ |
|---|---|---|---|---|---|

( *स्थापना :* तारीख २५ ऑगस्ट १९२३ )

**तत्त्वाचा बंदा जीव । मूर्तीला कोण विचारी?**

**www.prabhutarun.org**

*संपादिका:* **सुहासिनी कीर्तिकर** *कार्यकारी संपादक मंडळ :* **मिनाक्षी जयकर, मयुरा नायक, संजना कोठारे, वैजयंती कीर्तिकर**

*संपादकीय*

## उषेची भ्रूणहत्या...

**—सुहासिनी कीर्तिकर**

तारीख पंचवीस मार्च. 'महाराष्ट्र टाइम्स'च्या पहिल्या पानावर शरमेचा मजकूर- 'गर्भलिंग निदान आणि स्त्रीभ्रूणहत्येच्या प्रयत्नात दोन डॉक्टरांना सक्तमजुरी.' मुंबई-ठाणे परिसरातील अशी शिक्षा ठोठावली जाण्याची ही पहिलीच घटना. या संदर्भात निकाल देणाऱ्या न्यायमूर्ती के. एन्. गौतम यांचे भाष्य चिंतनीय. ते म्हणाले, 'देशातील पुरुषांच्या तुलनेत स्त्रियांची संख्या कमी होत असताना डॉक्टरी पेशातील सुशिक्षित मंडळींनी अशी कृत्ये करणे निंदनीय आहे. त्यांना कोणतीही दया दाखविता येणार नाही. त्यांना निर्दोष सोडले तर समाजात चुकीचा संदेश जाईल.' न्यायमूर्तींना मानलं बुवा! शिक्षेची जरब असेल तरच गुन्ह्यांना थोडासा आळा बसेल.

गेल्या आठवड्यात माझ्या घरी कवी श्री. प्रभाकर महाजन आले होते. वाशीच्या हॉलमध्ये (की नाट्यगृहात? नवी मुंबईच्या?) मान्यवर नाटककारांची तैलचित्रे काढणारे त्यांचे बंधु मधुकरही बरोबर होते. महाजन जळगावजवळच्या वाघुट गावचे. सानेगुरुजींच्या चळवळीचा हा गाव. महाजनांच्या घरी सानेगुरुजी उतरत असत. तर हे महाजनबंधु गप्पात उतरत उतरत जळगाव परिसरातील लेवा पाटील जमातीवर घसरले. ऐकीव माहिती होतीच. पण महाजनांच्या सांगण्याने त्यावर शिक्कामोर्तब झाले. असे काय सांगितले त्यांनी? लेवा पाटील हे मालदार. जमीनजुमला राखणारे. त्यांच्यात बाई गरोदर राहिली की सर्रास गर्भलिंगचाचणी केली जाते. मुलीचा गर्भ असला तर तो लगेच संपवला जातो. इस्पितळात जाऊन किंवा मग अगदी असंस्कृत अशा घरगुती उपायांनी! म्हणजे काढे दे, त्या बाईची 'सर्वार्थी'ने दमछाक कर किंवा मग अगदी लाटणे किंवा काठी कोचकून (!) तो गर्भ पाडला जातो. आता काय झालेय् त्यामुळे? सर्व भारतात जे चित्र; तेच लेवा पाटलांतही. पाटलांच्या पोरांना आता लग्नासाठी सजातीय मुलीच मिळत नाहीत. कारण त्यांनी जन्म घेण्याआधीच आईच्या उदरात शेवटचा श्वास घेतलेला असतो ना! 'शारदा' नाटकात 'अवघे पाऊणशे वयमान' तरुण वर पाहून शारदा आईला विनवते, 'तू टाक चिरून ही मान, नको धरू अनमान. नऊ मास वाहिले उदरी तिचा धरी काहीतरी अभिमान'. पण सध्याच्या न जन्मणाऱ्या अशा अनेक 'शारदां'ना नऊ मास उदरीदेखील वाहू दिले जात नाही! मग आता परिस्थितीवर मात करण्यासाठी हे लेवा पाटील काय करतात? तर झारखंडातील दरिद्री स्त्रिया विकत घेतात काही हजारांना. त्यांच्याशी पाटलाची पोरे लग्न करतात. काय नामी उतारा शोधून काढलाय् यांनी! सारे ऐकूनच महाजनांबरोबर घेत असलेल्या चहाची चव कडूझार होऊन गेली.

सुशिक्षित, सुसंकृत म्हणवणाऱ्या समाजात अजून हा स्त्रीपुरुषभेद, उच्चनीच भाव टिकून आहे. भले मग मुलगी 'धनाची पेटी' असो. शेवटी ती कन्याच ना? 'कम् नीयति सा कन्या।' म्हणजे मुलगी जन्मताच मातापितरांना प्रश्न पडतो की 'हिला कोण नेणार?'- अशी कन्येची एक व्याख्या केली गेली आहे. ती 'दुहिता' असते. म्हणजे ती 'दुर्हित' करते असा चुकीचा समज! खरे म्हणजे ती 'दुरेण हिता' म्हणजे भविष्यात ('दुरात') जी कालांतराने हित साधते ती दुहिता. पण कन्या म्हणजे वंशवृद्धीतला अडथळा मानला जातो. आजही! वंश वाढवणारे 'दिवटे' असले तरी त्यांचे चोचले पुरवायचे आणि कन्येने मात्र कुटुंबाचा गाडा रेटत राहायचा. तो रेटत राहूनही भागत नाही की काय? तिला जगात येऊच द्यायचे नाही. आपला देश विकसनशील आहे

(पान २ कॉलम १ वर)

*विस्तारीत संपादकीय*

## The Mom View

**-Mayura Nayak**

Recently I had the opportunity to write for a blog called "The Mom View". This is an initiative started by a mother, for all the mothers who keep seeking help online on various parenting issues. There are homemaker moms, working moms, single moms, etc. who contribute articles to this blog for other moms to refer to. I was specifically invited to share my views on being a working mother. And it is my pleasure to share my write up with you all here. This was published sometime in the month of October 2013, therefore you may find certain old references in the blog. Hope you all find this an interesting read, happy reading to you all! And as usual I look forward to your reactions!

Hello Friends!

I am a mom to two handsome boys Shaurya (7years) and Vir (2 years). Although I spend a lot of my time at work, once I am home, they both are quite a handful for the rest of the time that I am home. Shaurya is now growing up to be a very understanding older brother, but my little Vir is a bundle of mischief!

Time simply flies screaming, yelling, dancing, and playing with these kids! While my older one has his own set of friends he likes to spend time with, for my younger one I am the universe once I am home and of course for me as well! I would like to believe that both my kids have adjusted to the routine of their mom going to work and coming home to spend some quality time with them, although I sense it often that they would surely like having me around for a much longer time!

As a routine this life seems perfect, but this routine upsets when the kids fall ill. These monsoons season both Shaurya and Vir fell ill back to back within a month. When Vir was diagnosed with the Hand Foot Mouth viral I stayed home from work for a good five working days which means a complete week! We all know what it means to suddenly disappear from work that too unplanned. Having an understanding boss helped and he allowed me that lenience. But in less than 10 days Shaurya was down with a viral infection. This time I forced myself to work the first day of his fever. But when I came home he said to me "MOM you should have stayed home with me when I am unwell the way you stayed back for Vir" How would I explain to him that Vir is a baby and needs me more than him? Well, on second thoughts, Shaurya is after all just a 7 year old and needs me as much as Vir! Had I been a mom to just one kid, I would have all my energies focused only on him. Now my attention gets divided and partially more towards Vir. In his eyes I am an unfair mom and that is a hard realisation! I ended up working from home for the rest of the days he was unwell making up to him trying to change his perception of his mom.

As a working mom we are forever on a guilt trip. When kids fall sick we want to spend all the time looking after them, but often work commitments need our attention. We end up being unfair to our kids as well as our profession. I figured a few ways to strike this balance:

✶ Exhibiting an outstanding performance at work on all days that we are able to focus on work can help us get that lenience we need when we are needed at home

✶ Explaining to the kids by equating going to work with going to school helps me explain my 7 year old Shaurya the importance to attend work.

✶ Choosing a work place closer to home is a very practical solution so that we spend less time on roads and in traffic and spend more productive time at work as well as home.

✶ If work place is far, (which is so in my case) we can utilise the travel time in completing a lot of our work load, like sending out

(Cont. on Page 2 Col. 3)


(पान १ कॉलम २ वरून)

म्हणायचे आपले. पण याच देशात अशा गर्भलिंगचाचण्या होताहेत, मुलीचा गर्भ असेल तर तिला जगण्याचा उजेडच पाहू दिला जात नाही. समाजजागरण किती पातळीवर करायला हवे आहे ना! करायलाच हवे. म्हणूनच अशांना न्यायपातळीवर शिक्षा होताहेत, हे शुभंकर लक्षण आहे.

या भ्रूणहत्येच्या संदर्भात परवा घडलेला व्यंग-विनोद (उर्दूत ज्याला 'हझल' म्हणतात.) इथे सांगायचा मोह होतोय्. अर्थात तो अरसिक किंवा गंभीर मानायची गरज नाही. विनोदी अंगानेच घ्यायचा. मात्र त्यामागची मानसिकता खरीच! काय झालं की मालगुंडला 'को.म.सा.प.'ची कवितेची कार्यशाळा होती. या कार्यशाळेत 'पंच्याहत्तरनंतरची मराठी कविता-तिचे बदलते स्वरूप' या विषयावर माझा शोधनिबंध सादर करायचा होता. बरोबर सांगलीचे डॉ. अविनाश सप्रे होते. कविता सादरीकरणानंतर एक सत्र होते. त्यात अशोक नायगांवकरांची मुलाखत कवी अरुण म्हात्रे घेणार होते. मालगुंडच्या कवी केशवसुत स्मारकात खुल्या रंगमंचावर ही कार्यशाळा चांगली रंगली. अर्थात हे सारे असेच आपले सांगितले. सांगायचे ते वेगळेच. आमची राहण्याची व्यवस्था 'गणपतीपुळे' येथे केली होती. मग आम्ही संधी कसली सोडतो? अगदी पहाटे पाच-साडेपाचला समुद्रकिनाऱ्यावर फिरायला गेलो काहीजणी. मी, अनुपमा उजगरे, उषा परब वगैरे. तर गंमत म्हणजे आमच्यासारखेच महेश केळुसकर, अशोक नायगावकर, अरुण म्हात्रे, मधुसूदन नानिवडेकर (गझलकार) ही मंडळीही समुद्रतटावर आली होती. मग हास्यविनोद, गप्पा रंगल्या. बघता बघता सूर्यादय झाला. उषेची लाली संपली. अशोक नायगावकर त्यांच्या स्वभावानुसार पटकन् म्हणाले, 'उषेची सूर्यासाठी भ्रूणहत्या झाली.' राम गणेश गडकऱ्यांनी अशी विनोदी कल्पकता एकेकाळी दाखवली होती. 'रात्रभर 'निशा'पाणी करून पूर्वेस आलेल्या सूर्याच्या उषेने थोबाडीत मारली आणि ती स्वत:च लालीलाल झाली'... अशी कविकल्पना त्यांनी विनोदाने मांडली होती. आजच्या व्यंगहास्य करणाऱ्या नायगावकरांनी 'उषेची भ्रूणहत्या' कल्पिली. विनोद सोडून द्या. पण त्यामागची आजची मानसिकता किती भयावह! म्हणूनच सुरुवातीला सांगितलेल्या बातमीतल्या न्यायमूर्तींच्या निवाड्याचे कौतुक करायचे.

कौतुक करायचे आणि अवतीभोवती डोळसपणे वावरून अशा भयंकर अमानुषतेला आळा घालायचा. काही गोष्टी 'केल्याच पाहिजेत' या सदरातल्या असतात. तशीच ही गोष्ट.

मित्रहो, या गोष्टीवर विचार व्हावा, हीच विनंती. या पाडव्यापासून सुरू झालेले हिंदू नववर्ष तुम्हा सर्वांना सुखद, शुभद जावो हीच शुभेच्छा.



Rajan and Ketaki Jayakar participated in the Annual Vintage Car Rally held on 9th march 2014 alongwith their Austin of England of 1938. Since the participants were expected to dress in period costume, this year they chose to wear Bohri Costume. For the past few years they have been winning the first prize. It is their Parbhu Haus which gives them the enthusiasm to take part in the Fancy Dress Competition even at 60 plus. Alongwith them is their little grandson Shiv.

(Contd. from page 1 Col.4)

emails, making a few phone calls, etc.

∗ Explaining to our kids a few aspects of work, relating it to his life, or breaking it down with examples often helps in imbibing a sense of pride in them that their moms are as worthy professionally as their dads. (I heard my son tell his friend the other day let's play office office, I will be the boss the way my mom dad are bosses at their office)

∗ Finally there is no substitute to a mother's love, care and security she can give her child, but working mothers can find a great substitute in their Moms – in – law and moms who are very eager to play the role of grand moms. Especially in times of sickness they can be the best help we can ever ask for.

I am lucky to get that support from my family and this is surely one of the biggest reasons for me being able to continue my professional life. I hope the above ways can help some of the moms in handling such tough times. While I know we all face different circumstances and come from varied backgrounds and need customized solutions to our problems, what we have in common is our current longstanding status of being MOMS. We ride on the same emotional rollercoaster daily and sure can exchange our feelings on this wonderful platform helping each other raising our little wonders!

✳

## पाठारे प्रभु सोशल समाज

पा. प्र. सोशल समाजाचा १२६वा वर्धापनदिन सोहळा सोमवार दिनांक ३१ मार्च, २०१४ (गुढीपाडवा) रोजी सायंकाळी ५ वाजता खारच्या पा. प्र. सोसायटीच्या सांस्कृतिक सभागृहात भरगच्च गर्दीत उत्साहाने साजरा झाला. प्रमुख पाहुण्या होत्या डॉ. सौ. उषा (प्रभाकर) माहेश्वरी, एम.डी. नलिनी तळपदे रचित श्रीमती क्षमा कोठारे, सौ. रजनी कोठारे, सौ. योगिता नवलकर यांनी गायिलेल्या सरस्वतीवंदना आणि समाजगीताने समारंभाची नांदी झाली. समाजाच्या विश्वस्त सौ. वृंदा जयकरांनी आपले मनोगत व्यक्त करताना विद्यार्थ्यांना ज्ञाती समाजाला योगदान द्यावे अशी अपेक्षा व्यक्त केली. समाजाध्यक्ष श्रीमती स्वाती राणे यांनी आपल्या स्वागतपर भाषणात सोशल समाजाच्या कार्याचा आढावा घेतला. काळानुसार या संस्थेच्या कार्यात होणारे बदलही त्यांनी नमूद केले. तदनंतर स्वाती राणेरचित अध्यक्षाभिनंदन गीत कु. कुमुद सुश्रुत राणे यांनी गायले. डॉ. माहेश्वरींचा भेटवस्तू देऊन सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमात नव्वद वर्षे पूर्ण केल्याबद्दल श्री. रवींद्र मानकर यांचा विश्वस्त श्री. माधव जयकर यांच्या हस्ते शाल, श्रीफळ, मिठाई देऊन सन्मान करण्यात आला. या दिनी विविध श्रेक्षातील मान्यवरांना सुवर्णपदके आणि विद्यार्थ्यांना सन्मानचिन्हे, पारितोषिके देण्यात आली. समाजाचे संयुक्त कार्यवाह श्री. जयंत कीर्तिकर, उपाध्यक्ष सौ. स्वाती जयकर, सदस्य श्री. प्रसाद कीर्तिकर यांनी मान्यवरांचा परिचय करून दिला; तर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कार्यवाह सौ. नीता सेंजित यांचे होते. आईस्क्रीमने समारंभाची गोडी अधिकच वाढली.

याच सभागृहात २७ एप्रिल २०१४ रोजी समाजाने छायाचित्रांचे प्रदर्शन आयोजित केले आहे. सकाळी ११ ते रात्री ८ यावेळात हे प्रदर्शन खुले राहील. सर्वांनी याचा लाभ घ्यावा.

✳

## रंगोत्सव-अबिरोत्सव

'विठोबा कानोजी चॅरिटी'च्या रामवाडी येथील राम मंदिरात १२ मार्च २०१४ रोजी ह. भ. प. श्री. सिद्धेश मणेरीकर यांचे हरिकीर्तन झाले. पाठोपाठ 'श्री रंगोत्सव' निमित्ताने घाटकोपरच्या सौ. मनिषा देसाई यांच्या महिला मंडळाचे 'गीतरामायण' १७ मार्च २०१४ रोजी रंगले. विश्वस्त श्री. प्रताप वेलकर दोन्ही कार्यक्रमास जातीने उपस्थित होते. त्यांची कार्यनिष्ठा आणि ऊर्जा वाखाणण्याजोगी आहे. सर्वच्या सर्व विश्वस्तांनी, ज्ञातीय श्रोत्यांनी बहुसंख्येने या सोहळ्यात सहभागी व्हायला हवे ही त्यांची आस पुढील वर्षी प्रत्यक्षात येवो.

✳

## पाठारे प्रभु सोशल क्लबची 'सुहाना सफर'

दि. १३ मार्च २०१४ रोजी पा. प्र. सोशल क्लबची कर्नाळा येथील पॅनोरॅमिक रिसॉर्ट आणि वॉटर पार्क येथे सहल आयोजित करण्यात आली. १२५वा वर्धापनदिन असा आगळा साजरा करण्यात आला. एकूण चाळीसजणांनी या सहलीचा आनंद घेतला. कर्नाळ्यापर्यंतच्या ए.सी. बसप्रवासात क्लबतर्फे नाश्ता होताच; पण श्री. जयंत बा. कीर्तिकरांकडून लाडवांची गोड भेटही होती. वॉटर पार्कमधील 'रेनडान्स'सह अनेक खेळांचा आनंद सर्वांनी लुटला आणि रोप वॉक, व्हिडियो गेम्स आदींचीही मजा घेतली.

दुपारच्या भोजनानंतर पा. प्र. सोशल क्लबचा १२५वा वर्धापन दिन साजरा करताना सं. कार्यवाह श्री. नरेश मानकर यांनी सर्वांना उद्देशून भाषण केले. क्लबच्या भूतपूर्व आणि वर्तमानकालीन कार्याचा त्यांनी आढावा घेतला. उपस्थित प्रत्येक सदस्याने आपली ओळख करून दिली. या वर्धापनदिन सोहळ्याचे औचित्य साधून क्लबचे अध्यक्ष श्री. विनोद प्रधान यांचा श्री. उदय मानकर आणि श्री. प्रदीप कोठारे यांच्या हस्ते शाल, स्मृतिचिन्ह आणि मिठाई देऊन सत्कार करण्यात आला. ते क्लबचे सर्वात जुने सदस्य आणि पदाधिकारी. इतर सर्व सहभागी सदस्यांना १२५व्या वर्धापनदिनानिमित्त स्मृतिचिन्हे देऊन गौरविण्यात आले. यानंतर विविध खेळांचे आयोजन करण्यात आले होते. विजेत्यांना बक्षिसे दिली गेली. उत्तम शाकाहारी/मांसाहारी उपहार, भोजन, खेळ यामुळे ही सहल सर्वच सदस्यांच्या स्मरणात राहिली. अर्थातच भविष्यातही अशा सहली निघाव्यात, अशी भावना त्यांनी व्यक्त केली.

✳

लेखांक ४

# माणूस म्हणून-

## सवयीचे गुलाम

-डॉ. सुमन नवलकर

''काढ बघू ते तोंडातलं बोट.'' अंगठा चोखणाऱ्या इवल्याशा सागरिकेकडे पाहून चंदनाने हात उगारला. पण बोलण्याचा किंवा हात उगारण्याचा अर्थ कळण्याइतकी सागरिका मोठी थोडीच आहे? शिवाय तिच्या इवल्याशा अंगठ्यात अमृताचे सागर भरलेले आहेत. ती थोडीच इतक्या छोट्याशा धमकीला बधणार? शेवटी छोटीशी चापटी हातावर मारून चंदनाने तिचं बोट तोंडातून काढलं. इच्छेविरुद्ध झालेली बळजबरी न आवडल्याने सागरिकेने भोकांड पसरलं. मग तिचं लक्ष दुसरीकडे वळण्यासाठी चंदनाने तिला खिडकीपाशी नेऊन काऊ- चिऊ- झाड- आकाश- घरं- बिरं दाखवली. सागरिका खिदळली, रडू विसरली आणि चंदनाने तिला तिच्या खेळण्यांच्या टोपलीपाशी बसवल्यावर खेळता-खेळता थोड्याच वेळात तिचा अंगठा पुन्हा आपसूक तोंडात जाऊन, चुखू-चुखू चोखणं सुरू झालं.

''चोखू दे ग बिचारीला अंगठा.'' चिंतन कधीची मायलेकीची जुगलबंदी पाहून शेवटी म्हणालाच.

''चोखू दे कसलं? दात पुढे येतील तिचे. मग ऑर्थोडेंटिस्टकडे जाऊन ट्रीटमेंट घ्यावी लागेल तिला. फार मोठी, फार खर्चाची ट्रीटमेंट असते ती. शिवाय दुखतंही फार म्हणतात त्या ट्रीटमेंटमध्ये.''

'' अगं, पण एवढ्याशा जीवाला कितीदा रडवणार तू? शिवाय अंगठा तिचा, तोंडही तिचं आणि तुझी जबरदस्ती?''

'' तिच्याच भल्यासाठी करतेय ना मी हे? तुला एवढी दया येतेय तिची, तर खेळव ना जरा तिला. रमव ना तिचं मन जरा दुसरीकडे. मग रडायची नाही ती.'' पण चिंतन काही जागेवरून हलला नाही. सकाळचा एवढाच वेळ त्याला पेपर वाचायसाठी मिळतो. एकदा का तो पेपर टाकून उठला की पेपर वाचायचा राहिलाच म्हणून समजायचं.

शेवटी सागरिकेच्या दोन मुठींवर दोन छोट्या कापडी पिशव्या चंदनाने बांधल्या आणि ती घाई-घाईने कामं आटपू लागली. पिशवी चोखण्यात मजा येईना, तेव्हा सागरिका पुन्हा रडू लागली. पिशवी बांधलेल्या हातांनी तिला खेळणंही पकडता येत नव्हतं धड. तेवढ्यात चंदना तिची दुधाची बाटली घेऊन आली आणि या नव्या अमृतप्राशनात सागरिका अंगठ्यामधलं अमृत तात्पुरती विसरली. चंदनाचं लक्ष चिंतनकडे गेलं. तो पेपर वाचता वाचता हाताची नखं कुरतडत होता. वयाच्या सत्ताविसाव्या वर्षी नखं अशी कशी कुरडतू शकतो माणूस? अर्धा इंच लांबीची ती बिचारी नखं, खाऊन खाऊन पाव इंची झालीत. बोटं अगदी रोगट दिसतात त्यामुळे. उठून एक चापटी चिंतनच्याही हातावर मारायचा मोह झाला तिला. पण सागरिका अगदी झोपेला आली होती. तिच्या तोंडातून दुधाची बाटली काढणं सकाळच्या त्या घाईच्यावेळी चंदनाला परवडणारं नव्हतं. रागाचे एक-दोन कटाक्ष तिने चिंतनच्या दिशेने टाकले, पण ते त्याला आरपार भेदून गेले.

तेवढ्यात सागरिका झोपली, म्हटल्यावर तिच्या तोंडून अलगद दुधाची बाटली काढून चंदनाने तिला पाळण्यात नेऊन ठेवलं आणि चिंतनकडे एक शेवटचा रागाचा कटाक्ष टाकून ती तिच्या तयारीला लागली. लग्नाच्या आल्बममध्येही दोन-तीन फोटोंमध्ये चिंतन नखे खातोय हे तिला आठवलं आणि हसावं की रडावं ते कळेना तिला. लग्नाआधी ही सवय चिंतनने तिच्यापासून कशी लपवली होती कोणास ठाऊक. नाहीतर लग्नच केलं नसतं तिने त्याच्याशी. पश्चात्ताप करून काय उपयोग? चंदनाच्या तोंडून एक सुस्कारा सुटला. अगदी हलकेच. पण त्याचा आवाज कानात घुसल्यासारखा चिंतन उठून आंघोळीला धावला. प्रभाताई येईपर्यंत दोघं अगदी जय्यत तयारीत होती. खरं तर प्रभाताईवर सागरिकाला सोपवणं जीवावर येतं चंदनाला. पण बदलत्या राहणीमानात नोकरी सोडणं बसत नाही हे जाणून आहे ती. शिवाय प्रभाताई चिंतनच्या दूरच्या नात्यातल्या आहेत, विश्वासू आहेत म्हणून ठीक आहे. एरव्ही ब्युरोमधून आलेल्या अनोळखी बायांवर चंदनाचा मुळीच विश्वास नाही. त्यापेक्षा हे बरं. जवळपास चांगलं पाळणाघर नाही म्हणून. नाहीतर तिथेच ठेवलं असतं चंदनाने सागरिकाला.

घराबाहेर पडता-पडता चंदनाने मागे वळून पाहिलं. सागरिका शांत झोपली होती आणि तिथेच बाजूला खुर्चीत बसून प्रभाताई टोपी विणत होत्या. संध्याकाळी चंदना परत येईपर्यंत ही टोपी विणून पूर्ण होईल. 'या प्रभाताई सागरिकावर लक्ष ठेवतात की आपल्या विणतच बसतात?' दार ओढून घेता-घेता चंदना पुटपुटली.

''अगं, नशीब समज की त्या नाकात बोट घालून खरडवत नाहीत. केस खाजवत राहत नाहीत. अशाही स्वच्छ आहेत. घामट वासवाल्या नसतात कधीच,'' चिंतनने समजावले, ''नाहीतर खूपच जीवावर आलं असतं आपल्याला. विणतच बसतात ना? त्या निमित्ताने जाग्या तरी राहत असतील. निष्क्रिय बसल्या तर झोप येईल ना त्यांना? मग आपली सागरिका रडली तरी जाग यायची नाही त्यांना. त्यापेक्षा विणू दे बिचाऱ्यांना.''

बोलत बोलत दोघं जिन्यातून बाहेर पडली आणि आपापल्या दिशांना वळली. नशीब की चंदनाला नेहमीची बस मिळाली आणि कंडक्टरही नेहमीचाच होता. खरंतर कंडक्टर, वेटर, दुकानदार यांना आपण चेहऱ्याने ओळखतोच असं नाही. त्या-त्यावेळी आपलं ते-ते काम करून देण्याचं साधन असतात ते. पण या बसचा कंडक्टर चंदनाच्या चांगला लक्षात आहे. एक तर बहुतेकदा तिला हीच बस मिळते. पण तिचा पास आहे. पर्समधून काढून कंडक्टरपुढे धरायचा. त्याने तो मशीनखाली धरायचा आणि परत द्यायचा. या सगळ्या प्रक्रियेत कंडक्टरच्या तोंडापुढे बघावं लागत नाही. पण हा कंडक्टर जरा स्पेशल आहे. तो कधीही त्रासलेला नसतो. सुटे पैसे द्यायला कटकट करीत नाही. माणसांच्या अंगावर केकाटत नाही. माणसांना व्यवस्थित चढायला-उतरायला देतो. बायकांच्या सीटस्वर बसलेल्या पुरुषांना अदबीने उठायला सांगतो. ज्येष्ठ नागरिकाना त्यांच्या हक्काची सीट मिळवून देतो. सुरुवातीला चंदना या बसमधे चढली तेव्हा तिला वाटलं की बसवाल्यांचा 'सौजन्य सप्ताह' चालू आहे की काय? पण सात दिवसांनंतरही हा कंडक्टर सौजन्याने वागत राहिला तेव्हा लक्षात आलं की हा कंडक्टरच सौजन्यशील आहे

सकाळपासून स्वैपाकघर आणि बालसंगोपन अशा दोन आघाड्यांवर धडपडत असल्यामुळे चंदना पार वैतागलेली असते. पण मग या कंडक्टरची बस मिळाली की, सकाळभराचा शीण निघून जातो तिचा. गर्दीमधेही आपली माणुसकी हरवू न देणारा हा कंडक्टर तिचं 'रोलमॉडेल' बनतो आणि दिवसभर तिच्या मनाचा समतोल बिघडू न द्यायला तिला मदत करतो.

खरं तर या कंडक्टरला डोळे मिचकावायची इतकी सवय आहे की एकीकडे माणुसकीचे धडे गिरवत असताना हे डोळे मिचकावणे चालूच असतं. पण तिकडे चंदना कानाडोळा करते इतकंच. चंदनाच्या ऑफिसमध्ये तर निरनिराळ्या सवयींचे गुलाम नुसते ठासून भरलेत. कृतिकाच्या कानाला जणुकाही मोबाईल शिवलेलाच आहे. काम करताना, डबा खाताना, कोणाशी प्रत्यक्षात बोलतानाही तिच्या कान आणि खांद्याच्या चिमटीत तो मोबाईल फिट्ट बसलेला असतो. या सगळ्यात कानाला इजा होऊ नये म्हणून कानात कुठलाही अलंकार न घालण्याची तडजोडही केलीय कृतिकाने. नाही म्हणायला समारंभांना जाताना ती कपड्यांशी रंगसंगती साधेल असा मोबाईलच वापरते. तिचं लग्न कधी होतंय आणि ती आई कधी होतेय अशी घाई झालीय चंदनाला. त्या चौकटीत मोबाईल कुठे बसवेल कृतिका, हे पाहण्यात मजा आहे ना!

(पान ४ कॉलम ४ वर)

हसरी रेखा -प्रदीप कोठारे



# युवामंच

## करियर ऑपशन्स

**-विश्वास अजिंक्य**

*('करियर ऑपशन्स'साठी माहिती मागविली होती. त्याला श्री. विश्वास अजिंक्य यांचा प्रतिसाद लाभला. असा आणखीही प्रतिसाद अपेक्षित आहे.*

***-संपादक)***

### अप्लाइड आर्ट व फाईन आर्ट

चित्रकलेच्या विषयावर आधारित असणाऱ्या अप्लाइड आर्ट या विषयात करियर करण्यासाठी पदवी तसेच पदविका अभ्यासक्रम उपलब्ध आहेत. चार वर्षाच्या पदवी अभ्यासक्रमासाठी १२वी आर्टस्, सायन्स किंवा कॉमर्स कोणत्याही अभ्यासक्रमातून कमीत-कमी ४५ टक्के व राखीव वर्गातील विद्यार्थ्यांकरिता ४० टक्के मार्क्स असावे लागतात. तर पदविका अभ्यासक्रमासाठी १० वी उत्तीर्ण विद्यार्थ्यांना एक वर्षाच्या 'फाऊंडेशन कोर्स'नंतर चार वर्षांचा पदविका अभ्यासक्रम करता येतो.

### अप्लाईड आर्ट

केवळ आनंदासाठी किंवा स्वत:च्या समाधानासाठी चित्रकलेची निर्मिती करण्याचे दिवस आता राहिले नाहीत. पूर्वी राजे-महाराजे आपल्या दरबारात स्वत:चे पोट्रेट काढण्यासाठी प्रथितयश पेंटरची नेमणूक करीत असत. हे चित्रकार नंतर वेगवेगळ्या गावांना भेटी देऊन निसर्गरम्य देखावे, लोकजीवन, वस्ती, घरे, उत्सव, पक्षी, प्राणी यांचे हुबेहूब चित्रण करीत असत. नंतर ही कला चित्रपटाच्या जाहिरातीसाठी, पोस्टरसाठी, कॅलेंडर, ग्रीटिंग कार्डस्, पुस्तकाचे मुखपृष्ठ इत्यादीसाठी वापरली जाऊ लागली. कालांतराने अप्लाईड आर्टलाच लोक कमर्शियल आर्ट म्हणू लागले. औद्योगिकीकरणात वाढलेल्या स्पर्धेमुळे जाहिरातीचे युग आले. चित्रकला जाहिरात स्वरूपात दिसू लागली. सुंदर चित्राबरोबरच जाहिरातीचा मजकूर स्पष्ट करण्यासाठी 'कॉपी रायटिंग'चे कसब पणाला येऊ लागले. चित्रकलेला ॲबस्ट्रॅक्ट रूप देऊन वेगळा परिणाम साधणाऱ्या चित्रकाराला 'इलस्ट्रेटर आर्ट डायरेक्टर' म्हणून करियर करता येते. गेल्या काही वर्षात ॲनिमेशन तंत्राने संपूर्ण जाहिरात क्षेत्रात आपले वेगळे स्थान निर्माण केले आहे. हनुमान, श्रीकृष्ण यासारख्या ॲनिमेटेड चित्रपटांनी जगभर नाव कमावलं. जाहिरात क्षेत्रातीलच आणखी एक प्रकार म्हणजे कॉम्प्युटर ग्राफिक्स. चित्रकाराला संगणकाची मदत घेऊन कामे लवकर करता येतात. जाहिरातक्षेत्रात करियर करण्याच्या दृष्टिने अजून एक प्रकार म्हणजे व्यावसायिक प्रदर्शनांचे आयोजन. मोठमोठ्या प्रदर्शनात किंवा मॉलमध्ये जेव्हा वस्तू विक्रीसाठी ठेवल्या जातात; तेव्हा आपली वस्तूच लोकांना चांगल्याप्रकारे कशी दिसेल याचा विचार एक्झिबिशन डिस्प्ले करणाऱ्या चित्रकाराला करावा लागतो.

कमर्शियल आर्टच्या अभ्यासक्रमात 'एक्झिबिशन डिझाईन डिस्प्ले' किंवा 'फोटोग्राफी' असे दोन स्पेशलाइज्ड विषय आहेत. जाहिरात क्षेत्रात छायाचित्रणाच्या वेगवेगळ्या गरजा असतात. त्याचप्रमाणे इंडस्ट्रीयल फोटोग्राफी, फॅशन फोटोग्राफी, पोट्रेट फोटोग्राफ, टेबलटॉप फोटोग्राफी असे अनेक प्रकार आहेत. जाहिरात एजन्सीसाठी फ्रिलान्स काम करणारे अनेक छायाचित्रकार आहेत.

वरील सर्व विषय हे अप्लाइड आर्टच्या अभ्यासक्रमात शिकविले जातात.

### फाईन आर्ट

फाईन आर्ट विभागात विविध विषयांचे अभ्यासक्रम येतात. त्यात ड्रॉईंग अँड पेंटिंग, टेक्स्टाईल डिझाईन, स्कल्प्चर, इंटेरियर डेकोरेशन, मेटल वर्क, सिरॅमिक्स हे अभ्यासक्रम असतात. ड्रॉईंग अँड पेंटिंग विभागात प्रामुख्याने स्वैरपणे रंगांचा वापर करण्यात येतो. या पेंटिंग्जची मोठमोठ्या आर्ट गॅलरीजमधून प्रदर्शने भरविण्यात येतात. श्रीमंत व हौशी मंडळी ती खरेदी करतात. सध्या तयार कपड्यांना जोरदार मागणी असल्यामुळे टेक्स्टाईल डिझायनिंग, डाय व बाटिक पेंटिंग, ड्रेस डिझायनिंग तसेच फॅशन डिझायनिंग या विषयात करियर करण्याची चांगली संधी आहे. स्कल्प्चर म्हणजे शिल्पकला. ही आता पूर्णपणे बदलली आहे. फक्त देवदेवतांच्या मूर्ती न बनवता वेगवेगळ्या स्वरूपातल्या मूर्ती, ऑफिसमध्ये इंटेरियर डिझायनिंग-साठी लागणाऱ्या शोभेच्या वस्तू, कार्यालयीन इमारतीच्या आवारातील आकर्षक शिल्प किंवा डिझाइन्स हे मूर्तिकार करतात. घरसजावटीची, कार्यालयीन सजावटीची कामे इंटेरियर डेकोरेटर करतोच, पण इंटेरियर डेकोरेशन करणाऱ्या व्यक्तिंना दूरचित्रवाणी वाहिन्यांसाठी काम करायला भरपूर वाव आहे. रोज नवीन, नवीन कार्यक्रमांची निर्मिती करणाऱ्यांना काहीतरी हटके अशी सजावट करून हवीच असते. क्रीडा प्रकारात किंवा इतर उल्लेखनीय कामगिरी केल्यावर त्या व्यक्तिचा, स्मृतीचिन्ह, पदक किंवा चषक देऊन सत्कार केला जातो. ही स्मृतीचिन्हे लाकूड, प्लास्टिक किंवा विविध प्रकारच्या धातूत तयार केली जातात. मेटल वर्क करताना, रॉ मेटल, ग्लॉसी मेटल असे अनेक प्रकार करता येतात. सिरॅमिक विषयात चित्रकलेबरोबर वेगवेगळ्या केमिकल्सचे मिश्रण करून तयार होणाऱ्या टाईल्सपासून कार्यालयातील स्वागत कक्षासाठी विविध म्युरल्स तयार करता येतात. सिरॅमिक्सच्या विविध आकारातील भांडी दिवाणखान्यात तसेच हॉटेल्समध्ये अंतर्गत सजावटीसाठी वापरली जातात.

पदवी अभ्यासक्रमासाठी महाविद्यालयाची नावे- (१) सर जे. जे. स्कूल ऑफ आर्ट, मुंबई शासकीय महाविद्यालय, फाईन आर्टसाठी; (२) सर जे. जे. इन्स्टिट्यूट ऑफ अप्लाइड आर्ट, मुंबई, शासकीय महाविद्यालय. अप्लाइड आर्टसाठी; (३) शासकीय चित्रकला महाविद्यालय, नागपूर, अप्लाइड आर्ट व फाईन आर्ट; (४) शासकीय चित्रकला महाविद्यालय औरंगाबाद, अप्लाइड आर्ट व फाईन आर्ट; (५) रचना संसद कॉलेज ऑफ अप्लाइड आर्ट अँड क्राफ्ट, मुंबई. खासगी विना अनुदानित अप्लाइड आर्ट; (६) बी. एस. बांदेकर कॉलेज ऑफ फाईन आर्ट, सावंतवाडी, खासगी विना अनुदानित, फाईन आर्ट; (७) पद्मश्री डॉ. डी. वाय. पाटील कॉलेज ऑफ अप्लाइड आर्ट अँड क्राफ्ट, पुणे, खासगी विनाअनुदानित अप्लाइड आर्टसाठी; (८) भारती विद्यापीठाचे कॉलेज ऑफ फाईन आर्ट, पुणे, खासगी विना अनुदानीत, अप्लाइड आर्टसाठी.

वरील सर्व कॉलेजमधून एकंदर ६०० विद्यार्थ्यांना हा पदवी अभ्यासक्रम करता येतो. प्रवेशाकरिता इच्छुक विद्यार्थ्यांना केंद्रीय प्रवेश प्रक्रियेतून पार पडावे लागते. प्रवेश परीक्षेसाठी (१) ऑब्जेक्ट ड्रॉईंग (५० गुण); (२) डिझाईन (५० गुण); (३) जनरल नॉलेज (४० गुण); (४) मेमरी ड्रॉईंग (५० गुण) सर्व मिळून १९० गुणात इंटरमीडिएट ड्रॉईंग ग्रेड परीक्षेतील 'ए' ग्रेडला १० गुण, 'बी'ग्रेडला ६ गुण व 'सी'ग्रेडला ४ गुण मिळवून गुणांनुसार मेरीट लिस्ट तयार केली जाते.

१०वी नंतर १ वर्षाचा फाऊंडेशन कोर्स व त्यानंतर ४ वर्षांचा डिप्लोमा कोर्स करण्यासाठी कला-संचालनालय, महाराष्ट्र शासनाच्या अखत्यारीत येणाऱ्या संस्था:-

(१) सोफिया पॉलिटेक्निक (विद्यार्थिनींसाठी राखीव) फाऊंडेशन, जी. डी. आर्ट कमर्शियल, टेक्स्टाईल डिझाईन; (२) रहेजा स्कूल ऑफ आर्टस्, वांद्रे. फाऊंडेशन, जी.डी. आर्ट कमर्शियल, जी.डी. आर्ट पेंटिंग;

(पान ५ कॉलम ४ वर)

**(पान ३ कॉलम ४ वरून)**

समोर काचेच्या केबीनमध्ये साहेब बसतात. हाताने जे-जे अक्षर लिहीत असतात त्याच्या आकारासारखं त्यांचं तोंड हलत असतं. कधी खालचा जबडा पुढे तर कधी वरचा. कधी जबडा डावीकडे तर कधी उजवीकडे. कधी दात-ओठ खाणं चालू, तर कधी मूग गिळून गप्प बसल्यासारखं तोंड. केबीनबाहेरचे सगळे प्राणी या मुद्रा निरखत खुसू-खुसू हसत असतात. वॉचमन सदा कान कोरत असतो, तर शिपाई वेळ मिळेल तेव्हा डोळ्यांवर टोपी ठेवून घोरत असतो. वासवानी दर अर्ध्या तासाने कटिंग चहा पितो, सातार्डेकर दर अर्ध्या तासाने बाहेर जाऊन सिगरेट फुंकून येतो. चित्रा सारखी प्रसाधनगृहात जाऊन ओठांवर लिपस्टिक फिरवून येते. सुप्रिया अख्खा दिवस एकच गाणं गुणगुणत असते. नव्या दिवशी नवं गाणं.

-या सर्व सवयींच्या गुलामांच्या तावडीतून सुटून-निसटून संध्याकाळी चंदना घरी आली तेव्हा ती किती वर्षांनी भेटल्यासारखी सागरिका तिच्याकडे झेपावली. दिवसभर प्रभाताईंकडे असूनही तिला तिची सवय होत नाही. ही इकडे रडत असेल आणि त्या तिकडे विणत असतील. टोपी विणून पूर्ण झाली होती आणि चंदनाच्या लक्षात ते आलंच. रात्री सागरिकेचं सगळं आटोपून चंदनाने तिला झोपवलं. मग ती आणि चिंतन जेवले. आवरा-आवर आणि दुसऱ्या दिवसाची थोडी तयारी करून चंदना मोकळी होईपर्यंत चिंतन गाढ झोपला होता. चंदनाने वर्तमानपत्र चाळलं तेव्हा कागदाच्या फर्र-फर्र आवाजाने चिंतनची झोप चाळवली. 'चक्-चक्', 'छ्या! छ्या!' असे वेगवेगळे नाराजीदर्शक उद्‌गार काढले त्याने. पण तिथे सोयिस्करपणे दुर्लक्ष करीत चंदनाने वर्तमानपत्र हातावेगळं करून वाचनालायातून आणलेले पुस्तक हाती घेतलं. खरं तर थकलीय ती. झोपेची नितांत गरजही आहे. सकाळी लवकर उठायचंय ना? पण वाचायची सवय अशी आहे की वाचल्याशिवाय झोपच येत नाही. तेवढ्यात उजेड आणि आवाजाने सागरिकेची झोपही चाळवली. नशीब की उठून नाही बसली ती. पुस्तक ठेवायसाठी चंदना उठली तेव्हा सागरिका झोपेत अंगठा चोखत होती आणि चिंतन चक्क झोपेतही नख खात होता.

*

लेखांक-४

# केल्याने देशाटन

**— हेमलता केशव कोठारे**

ऑस्ट्रेलियातील ऑफिस एरियाला 'डाऊन टाऊन' म्हटले जाते. कॅनडा आणि अमेरिकेतही ऑफिस एरिया 'डाऊन टाऊन'च असतो. हा फार जुना भाग आहे. येथील रेल्वे स्टेशन्स भव्य व देखणी आहेत. डाऊन टाऊनमधील सर्व जुन्या इमारतींवर ठसा दिसतो तो उत्कृष्ट ब्रिटिश स्थापत्याचा. मी या इमारती पाहिल्या तेव्हा मला मुंबईतील एशियाटिक लायब्ररी, अमेरिकन एक्स्प्रेस इमारत, हायकोर्ट, एलफिन्स्टन कॉलेज, फ्लोरा फाऊंटन इत्यादी फोर्ट एरियाच आठवला. मोठमोठे खांब, उंच छते, भव्य खिडक्या आणि दारे, दगडी बांधणी व त्यावरील कोरीव काम या ब्रिटिश स्थापत्याच्या ओळखीच्या वास्तुखुणा सर्वच पाश्चिमात्य स्थापत्यात आढळतात. या डाऊन टाऊन एरियात पर्यटकांसाठी वरचा डेक उघडा असलेल्या खास बसेस असतात. त्यात एक गाईडही असतो. प्रत्येक इमारतीचा इतिहास, इमारतीमधील स्थळे यांचे धावते समालोचन तो करतो. बसमधून हवे तिकडे उतरता येते. पर्यटकांच्या सोयीसाठी जागोजागी वेगवेगळ्या ट्रॅव्हल्सचे लोक स्थळांची तिकिटे, संबंधित रस्त्यांचे नकाशे घेऊन उभे असतात. ह्या भागात ट्रॅम्सही चालतात. मोठमोठे पार्कस् या भागाची शोभा वाढवितात. सिडनी हार्बरशेजारचे समुद्रकिनाऱ्यावरचे जगप्रसिद्ध 'ऑपेरा हाऊस' येथेच आहे. या अप्रतिम वास्तूचे काम १९५७ ते १९७३ (सोळा वर्षे) चालू होते. जगातील आधुनिक स्थापत्याचा उत्कृष्ट नमुना आहे हा. डेन्मार्कच्या जॉन उटझोन (Utzon) या अभियंत्याची ही करामत आहे. ऑपेरा हाऊसची रचना लाकडी जहाजाप्रमाणे आणि फुलाच्या पाकळ्याप्रमाणे वाटते. २००७ मध्ये या सिडनी ऑपेरा हाऊसचे नामनिर्देशन जगाच्या उत्कृष्ट ऐतिहासक वास्तूंच्या यादीत जाहीर झाले. वयाच्या नव्वदाव्या वर्षी नोव्हेंबर २००८ला कोपेनहेगन येथे हा उटझोन मरण पावला. त्याआधी २००७ मध्ये सिडनीत या उटझोनचा 'वास्तूचा शिल्पकार' म्हणून सत्कार करण्यात आला.

डार्लिंग हार्बरच्या परिसरातच एक मोठे मत्स्यालय आहे. हे समुद्राखाली बनविण्यात आले आहे. विविध जाती रंगाचे मासे, विविध आकार-रंगाचे कोरल्स याची शोभा वाढवितात. कोरल्स पाहताना विधात्याची निर्मिती बघून मन थक्क झाले. निर्मितीची विविधता किती असावी याला सीमाच नाही! मत्स्यालयाची रचना अशी की काही मोठे मासे आपल्या डोक्यावरून फिरतात. (अर्थात्- काचेत.) मनात आले; समुद्राच्या या तळात किती अन् काय दडले आहे, खऱ्या अर्थाने तो रत्नाकर ! माणसाला समुद्राने घातलेले कोडे अजून पुरते सुटलेले नाही.

सिडनीत प्रचंड मोठे पार्कस् आहेत. त्यापैकी 'कोआला पार्क' हा एक. 'कोआला' हा अस्वलसदृश ऑस्ट्रेलियन प्राणी. पण अस्वल जंगली तर कोआला अतिशय निरुपद्रवी. त्याचा रंग राखाडी. अंगाने गुबगुबीत अन् फारच सुस्त, आळशी. त्याचं वैशिष्ट्य म्हणजे तो फक्त विशिष्ट निलगिरीच्या झाडाची पानेच खातो. कायम निलगिरीच्या झाडावर झोपलेला, नाहीतर आपला बसलेला. निलगिरी हे मूळचे ऑस्ट्रेलियाचे झाड. त्याच्या शेकडो जाती ऑस्ट्रेलियात आहेत. दिवसाकाठी १८-२० तास कोआला झोपून घालवतो. मी प्राजक्ताला (माझ्या मुलीला) गंमतीने म्हणे की, 'तुझ्या मुलाला कोआलाचे खेळणे देऊ नकोस. दाखवूही नकोस कोआला त्याला. नाहीतर तो त्याच्यासारखाच आळशी, झोपाळू होईल.' कोआला पार्कमध्ये ऑस्ट्रेलियन पोपट पाहिला. आपल्याकडील पोपटापेक्षा देखणा, रंगाने सुंदर. तेथील कावळा आपल्यासारखाच, पण थोडा निराळा. पण आपल्या कावळ्यापेक्षाही हा विचित्र कर्कश ओरडतो. 'कोकाटू' नावाचा एक ऑस्ट्रेलियन पांढराशुभ्र पक्षी आहे. हा देखील इतका कर्कश ओरडतो की असह्य होते. कोकाटूवरूनच 'केकाटणे' आले की काय? पार्कमध्ये इतरही प्राणी बरेच आहेत. ऑस्ट्रेलियन लिझर्ड (पाल) इतकी मोठी की मला ती घोरपडच वाटली. कसेसेच झाले तिला पाहताना. मात्र या सर्व प्राण्यांना ऑस्ट्रेलियात अभय आहे. ह्या पाली घराच्या कुंपणातही येतात. त्यांना मारता येत नाही. रस्त्यात पहुडलेल्या मगरींनाही मारता येत नाही. नियमच आहे तसा. जर तुम्हाला त्यांना हाकलायचे असेल तर कौन्सिलची (म्युनिसिपल कॉर्पोरेशन) लेखी परवानगी घ्यावी लागते. नंतर त्यांचीच माणसे येऊन पालींना घेऊन जातात. मारले किंवा अपाय केला तर सज्जड दंड भरावा लागतो. या देशाला प्राण्यांचे एवढे प्रेम व कळवळा का? याचे उत्तर मला मिळाले नाही. असो. कांगारू हा तर त्यांचा राष्ट्रीय प्राणी. तो मूळचा ऑस्ट्रेलियाचाच. नवीनच चालणारे लहान मूल तसे दुडक्या चालीने चालते तसे थोडेफार कांगारूंचे चालणे गंमतीशीर असते. ऑस्ट्रेलियन एअरवेज 'क्वांटास'च्या विमानाच्या शेपटावर लाल रंगाचे कांगारूचे चित्रच मिरवते.

'ब्लू-मॉटन्स' हे सिडनीपासून बरेच लांबचे ठिकाण आहे. 'कॅप्टन कूक' हा जगप्रवासी ऑस्ट्रेलियात प्रथम आला तो या ठिकाणी. येथे पूर्वी निलगिरीचे अरण्य होते. या निलगिरीच्या पानांवर सूर्यकिरणे पडून परावर्तित प्रकाश निळसर वातावरण तयार करतो म्हणून हे ब्लू-मॉटन्स. येथला निसर्ग फार विलोभनीय. पहाडावर तीन उंच सुळके शेजारी शेजारी उभे आहेत स्त्रियांच्या आकाराप्रमाणे. म्हणून या 'थ्री-सिस्टर्स'! येथे पहाडावर रोप-वे आहेत. यात बसून रम्य परिसर पाहता येतो.

*

# एक आगळा वेगळा महिला दिन

**-सौ. अचला सुभाष देसाई**

८ मार्च २०१४च्या सकाळी आम्ही दहा उत्साही प्रवासी निघालो दाभोळला. सहा तासांच्या प्रवासानंतर दापोलीच्या 'आम्रपाली ग्राम सहवास'मध्ये विसावलो. सुग्रास अन्नाचा आस्वाद घेऊन आम्ही निघालो आदिवासी स्त्रियांच्या भेटीला. तिथल्याच एका सभागृहात त्यांच्या कलेचे प्रदर्शन होते- गायन, नृत्य वगैरे. 'ग्राम मंगल' ही संस्था ऐने-विक्रमगड (तालुका डहाणू) या भागात काम करते. त्यांचे अनेक उपक्रम आहेत. ज्यात आपण शहरी जन भाग घेऊ शकतो. मग गाठले दाभोळ बंदर व फेरीने गेलो पलीकडे अंजनवेलला व दाभोळ वीज प्रकल्पाजवळ 'नातू संस्थान' चलित शाळा व ज्युनियर कॉलेजला भेट द्यायला. ह्या संस्थानाच्या चालिका श्रीमती नातूवहिनी भेटल्या. त्या चिपळूणहून आम्हाला भेटायला आल्या होत्या. ह्या माऊलीने स्त्री-शिक्षणासाठी आपले जीवन सार्थकी लावलेले आहे. त्यांच्यासोबत खेड्यातल्या दोन विद्यार्थिनी मनाली व प्रणाली बोबसकर होत्या. अतिशय गोड गळा लाभलेल्या दोन बहिणी. कोणतेही प्रशिक्षण न घेता, त्यांनी एक भजन म्हटले- 'प्रभू तू दयाळू कृपावंत दाता...' अजून ते स्वर कानात घुमताहेत. बारावीनंतर संगीतात बी.ए. करायची इच्छा आहे.दाभोळपासून आमच्या सोबत पितासमान दलितमित्र श्री. अण्णा शिरगांवकर होते. पुढचा प्रवास होता गुहाघर येथे अपंग पुनर्वसन केंद्रापर्यंत. अण्णांच्या मार्गदर्शनाखाली सुरू झालेली 'गुहागर तालुका अपंग पुनर्वसन संस्था'. इथे भेट दिली. तिथे कर्मचारीही अपंग आहेत. पण उत्तम काम करताहेत. ह्याच संस्थेचे अपंगांसाठी संकुल उभे राहणार आहे जिथे जवळच्या गावामधील अपंग व्यक्तींना लाभ घेता येईल. ह्या संस्थेला डॉ. बाळासाहेब ढेरे यांच्यासारखे तरुण कार्यकर्ते लाभले आहेत जे पुढल्या कार्यात मार्गदर्शन करताहेत.

आमच्याकडे मोजकाच वेळ असल्यामुळे तिथून धाव घेतली धक्क्याकडे. दिवसाची शेवटची फेरी घेण्यासाठी. मग काय? रात्रीच्या भोजनाची चंगळ! मासे-मासे आणि मासे. असा आमचा 'वुमन्स डे' रात्री १२ वाजता दापोलीत येऊन संपला. दुसऱ्या दिवशी सकाळ फार सुंदर वाटली. परिसर रमणीय असून शांत वातावरण मनाला मोहून टाकत होते. पण काय करणार? मुंबई-ठाणे तर परत गाठायचे होते ना! दहा उत्साही प्रवासी घराकडे निघाले, पण मनात ह्या गावाकडचे प्रसंग साठवून. माझ्यासोबत होते श्री. सुभाष देसाई, श्री. शौनिक देसाई, श्री. अजय तळपदे, सौ. अनुराधा तळपदे, श्रीमती सुरभी वेलकर, श्री. तुषार कीर्तिकर, सौ. सुजाता कीर्तिकर, श्रीमती अपर्णा कीर्तिकर व सौ. मंदा लोके.

आम्ही ठरवलंय, आपापल्या परीने गावाकडच्या स्त्रियांना मदत करायची. तुमच्यापैकी कोण कोण सहभागी होणार?

*

(पान ४ कॉलम ४ वरून)

(३) मॉडेल आर्ट इन्स्टिट्यूट, दादर. फाऊंडेशन ए. टी. डी., (४) मुंबई कला महाविद्यालय, चर्नी रोड, फाऊंडेशन; (५) ठाणे स्कूल ऑफ आर्ट, ठाणे. फाऊंडेशन, इंटेरियर डेकोरेटर्स, फाईन आर्ट; (६) वसई कला निकेतन, वसई. फाऊंडेशन, कमर्शियल आर्ट, फाईन आर्ट.

चित्रकलेत करियर करण्यासाठी पदविका की पदवीचा अभ्यासक्रम निवडावा असा प्रश्न पालक आणि विद्यार्थ्यांच्या मनात निर्माण होतो. आपली शैक्षणिक आणि आर्थिक पार्श्वभूमी, आपलं वय आणि आपल्यापाशी उपलब्ध असलेला वेळ यावर अभ्यासक्रमाची निवड अवलंबून असते. १०वी नंतर पदविका पूर्ण करून लवकरात लवकर नोकरी-व्यवसायाचा रस्ता धरणे गरजेचे असेल तर पदविका अभ्यासक्रम उत्तम पर्याय ठरतो. तर हाती वेळ आणि पैसा असेल तर १२वी नंतर चार वर्ष कालावधीचे पदवी अभ्यासक्रम पूर्ण करता येतील.

*

## प्रभु तरुण आश्रयदाते


१) सौ. विमल व श्री. माधव नायक,
२) सौ. नलिनी व श्री. रविंद्र रामराव मानकर,
३) सौ. अनामिका बी. ए. एल.एल.बी.
४) कै. नटवर्य नारायण रामराव झावबा
५) कै. सॉ. मोतिराम विनायक जयकर
६) आद्य संपादक कै. विष्णु कृष्ण कोठारे
७) कै. रावसाहेब चंद्रकांत बालमुकुंद वेलकर
८) कै. सौ. सुशीला यशवंतराव कीर्तीकर
कै. सौ. सुशीला व श्री. मोरेश्वर वि. प्रधान
९) सौ. मीरा व श्री. रविंद्र नानूजी दळवी
१०) कै. सौ. शलाका (अरुणप्रभा) शैलकुमार श्रीकृष्णनाथ दळवी
११) कै. श्रीमती चंपुबाई आणि
कै. आनंदराव सुंदरजी धराधर
१२) कै. सौ. रोहिणी (रत्नप्रभा) श्रीकर राणे
१३) सौ. निलीमा व श्री. सूजन केशवराव राणे
१४) कै.श्रीमती रोझाबाई आणि कै. बाळाराम केरोबा नायक
१५) कै. शरद विनायक कीर्तिकर यांच्या स्मरणार्थ अनामिक
१६) कै. सॉ. दिलीप रघुनंदन कोठारे
१७) कै. श्रीमती कमलजा आनंदराव अजिंक्य
१८) कै. दिवाळीबाई व कै. डॉ. वामनराव आनंदराव विजयकर
१९) कै. विष्णुराज बाळाराम नायक
२०) ॲड. सदाशिव आनंदराव धुरंधर
२१) कु. कस्तूर मोठाबाई जयकर
२२) कै. कमलिनी रमाकांत प्रधान
२३) कै. नटवर्य शरद श्रीकृष्णनाथ गणपतराव दळवी
२४) आद्य मराठी लघुलिपीकार कै. भुजंगराव रामचंद्र मानकर
२५) कै. वामन मोरेश्वर प्रभाकर
२६) कै. चंद्रकांत नारायण विजयकर,
कै. कुंजविहारी वाय. जी. तळपदे,
कै. प्रविण चंद्रकांत नारायण, विजयकर,
कै. वैभव कुंजविहारी वाय. जी. तळपदे
यांच्या स्मरणार्थ एक हितचिंतक
२७) कै. डॉ. विद्याधर चंद्रकांत नारायण विजयकर यांच्या स्मरणार्थ हितचिंतक
२८) कै. पूर्णचंद्र केशरीनाथ राव व
कै. सौ. शीला पूर्णचंद्र राव यांच्या स्मरणार्थ
२९) डॉ. राम गोविंदराव नवलकर
३०) सौ. शुभांगी राम नवलकर
३१) सौ. रीटा आणि श्री. मंदार माधवराव नायक


## प्रभुतरुणास देणगी

✳ **कै. डॉ. ईश्वरी आणि विद्याधर चॅरिटेबल ट्रस्ट'तर्फे ट्रस्टच्या विश्वस्तांकडून रु. १,००,०००/-**

**या रक्कमेच्या व्याजातून 'प्रभुतरुण'चा वर्धापनदिन आणि 'प्रत्युष' किंवा तत्सम कार्यक्रम साजरे करावेत अशी विश्वतांची अपेक्षा आहे. तसेच या सर्व कार्यक्रमात कै. डॉ. ईश्वरी विद्याधर विजयकर यांच्या नावाची आठवण जाहीरपणे केली जावी; अशी अट आहे. या ट्रस्टच्या विश्वस्त प्रमिला मधुकर तळपदे यांना मन:पूर्वक धन्यवाद. चांगल्या गोष्टींची आठवण प्रभुतरुण नेहमीच करतो, करेल.**

✳ डॉ. प्रभाकर व्ही. कोठारे यांच्या ७५व्या वाढदिवसाप्रीत्यर्थ सौ. अनीला प्रभाकर कोठारे, सौ. अंकिता आणि श्री. प्रनील प्रभाकर कोठारे आणि चि. धृवांक प्रनील कोठारेकडून रु. १००१/-

✳ श्री. निमेष चंद्रसेन मनमोहन सेंजित यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ रु. १००१/-

✳ कै. श्रीमती मंजुळा नारायण धराधर यांच्या सहाव्या स्मृतिदिना-निमित्त त्यांची नात सौ. प्रीति राकेश धैर्यवान याजकडून रु. ५००/-

✳ कै. श्री. आनंदराव श्रीकृष्ण प्रधान आणि कै. श्रीमती सुनिती आनंदराव प्रधान यांच्या स्मृत्यर्थ सौ. मंगला सुहास प्रधान आणि श्री. सुहास आनंदराव प्रधान यांजकडून रु. ५०१/-

✳ श्री. स्मितचंद्र श्रीनाथ नवलकर यांजकडून रु. २५०/-

सर्व देणगीदारांचे आभार.

✳

## अभिनंदन

✳ ११ ते १५ फेब्रुवारी २०१४ दरम्यान चंदीगड येथे झालेल्या १३व्या अखिल भारतीय आंतरविद्यापीठ नेमबाजी स्पर्धेत महिलांच्या १० मीटर पिस्तुल शूटिंगच्या गटात मुंबई विद्यापीठातर्फे कु. वैजयंती विश्वास अजिंक्य हिचा सहभाग होता. वैजयंतीने ४०० पैकी ३५४ गुण मिळवून मुंबई विद्यापीठाला महिला गटात तिसरा क्रमांक मिळवून दिला. (पुरुष गटातही विद्यापीठ तिसरे आले.) 'महाराष्ट्र टाइम्स' या दैनिकाने वैजयंतीच्या यशाची नोंद केली आहे. परवाच सचिन आणि सुप्रिया पिळगावकरांनी आपल्या कार्यक्रमात अंजली भागवतची मुलाखत घेतली तेव्हा वैजयंती; अंजलीच्या जागी तूच आम्हाला दिसत होतीस. भविष्यात 'चॅम्पियन ऑफ चॅम्पियन' हा किताब तुलाही तुझ्या कर्तृत्वाने मिळो. अभिनंदन वैजयंती.

✳ लळित रंगभूमी, पुणे या संस्थेतर्फे राज्यस्तरावर लळित साहित्य पुरस्कार दिले जातात. २०१० सालच्या पुरस्कारात विनोदी साहित्यासाठी असलेल्या पुरस्काराचे मानकरी ठरले श्री. नंदकुमार विजयकर. रविवार दिनांक ९ मार्च २०१२ रोजी पुणे येथे झालेल्या पुरस्कार वितरण सोहळ्यात श्री. नंदकुमार यांच्या 'सल-शिरा' या पुस्तकास हा पुरस्कार डॉ. आनंद यादव यांच्या हस्ते देण्यात आला. हा कौतुक सोहळा पाहण्यास सौ. व श्री. अनिल राव जातीने उपस्थित होते. 'प्रभुतरुणा'चे लेखक असलेल्या नंदकुमार यांचे मन:पूर्वक अभिनंदन.

✳ कुमारी दीप्ती संदीप देसाई हिने टेक्स्टाइलच्या इंटरनॅशनल कॉन्फरन्समध्ये पहिले पारितोषिक पटकावले. अभिनंदन.

## प्रभुतरुणाची डायरी

### जनन

| | | | |
|---|---|---|---|
| ०५-०३-१४ | श्री. मिहीर राजीव तळपदे, | कन्या | |
| ३१-०३-१४ | सौ. केतकी आणि श्री. तेजस प्रदीप राणे, | पुत्र, | पुणे |

### आत्याबाई नाव बोला

कुमारी लेशा मिहीर राजीव तळपदे,

### मरण

| | | | |
|---|---|---|---|
| ०५-२-१४ | श्री. नंदलाल खंडेराव राणे | वय ७४, | खार |
| १०-२-१४ | सौ. चित्रा चंद्रदत्त नवलकर | वय ५९, | सायन |
| २१-३-१४ | श्री. निमिष चंद्रसेन मनमोहन सेंजित | वय ५३, | गोरेगाव |
| ०५-४-१४ | सौ. शीला (सुमती) चंद्रकांत कोठारे | वय ८३ | पुणे |

***चुकीची दुरुस्ती:*** गतांकी मरण या सदरात श्री. शैलकुमार श्रीकृष्णनाथ दळवी असे वाचावे.

✳ दिनांक ९ मार्च २०१४ रोजी ठाणे मराठी ग्रंथ संग्रहालय येथे श्रीमती मृदुला प्रभुराम जोशी यांच्या 'आभिजन प्रियजन' या ललित लेखसंग्रहाचे उद्योजक/साहित्यिका श्रीमती अचला जोशी यांच्या हस्ते प्रकाशन झाले. विश्वसखा प्रकाशनाचे हे पुस्तक प्रकाशकांची संपादक असलेल्या मृदुला यांचे अनुभव सांगणारे आहेच. त्याचबरोबर आई-वडील, राम जोशी, डॉ. शं गो. तुळपुळे, स. मा. गर्गे आदींच्या सहवासातील अनुभव आणि त्यांची नेटकी व्यक्तिचित्रेही आहेत. राष्ट्रसेवा दलाचे कलापथक, शाळा-कॉलेजचे मंतरलेले दिवस, संपादक म्हणून ग्रेस, स्नेहप्रभा प्रधान आदींचे अनुभव... असा समग्र तपशील लेखालेखातून विखुरला आहे. आकाशवाणीवरील 'चिंतन'ही त्यात भर घालते. ज्यांच्या अनुभवाने-सहवासाने मृदुलाचे व्यक्तित्व घडले ते 'पॉप्युलर'चे रामदास भटकळ समारंभाच्या अध्यक्षपदी होते. डॉ. कुमुद कानिटकर या पुस्तकाबद्दल फार सुरेख बोलल्या. प्रकाशनविश्वात हे पुस्तक एक दस्तावेज म्हणून निश्चितच मोलाचे आहे. अभिनंदन.

✳ कवी केशवसुत यांच्या जन्मगावी म्हणजेच मालगुंडला केशवसुत स्मारकात को.म.सा.प. तर्फे 'कवितेची कार्यशाळा' घेण्यात आली. '७५ नंतरच्या मराठी कवितेचे बदलते स्वरूप' या विषयावर अडीच तास चर्चासत्र होते. त्यात, डॉ. अविनाश सप्रे आणि त्यांच्या जोडीने सुहासिनी कीर्तिकरांनी शोधनिबंध सादर केला. त्याला उत्तम प्रतिसाद लाभला. चार्चिकांनी 'कीर्तिकर-बाईंनीच दोन तास बोलायला हवे होते' या शब्दात दाद दिली. 'महानगरी वार्ताहर'मध्ये त्यांचा स्त्रीवादी साहित्यावर लेख प्रसिद्ध झाला.

✳ गावदेवी चौकाचे २ मार्च २०१४ रोजी 'आमदार प्रमोद नवलकर' असे महापालिकेतर्फे नामकरण करण्यात आले.

✳ 'महानगरी वार्ताहर'मध्ये डॉ. सुमन नवलकरांचा 'संघर्ष: जीवनाशी प्रामाणिक राहून' हा लेख प्रसिद्ध झाला. हा अंक 'जागतिक महिला दिन विशेष' होता. डॉ. सुमन यांचे अभिनंदन.

✳ सौ. स्वरांगी स्मितचंद्र नवलकर यांची नौकार बिल्डर्स अँड डेव्हलपर्स प्रा. लिमिटेड या कंपनीत डायरेक्टर पदावर नेमणूक झाली. अभिनंदन

✳

## परीक्षेतील सुयश

**एम्.एस्. (मास्टर ऑफ सायन्स-फूड सायन्स)**
डेक्सेल युनि. फिलाडेल्फिया, यु.एस.ए.
कुमारी नेहा रोहित जयकर

**पीएच्डी (बायोटेक्नॉलॉजी, मुंबई विद्यापीठ)**
कुमारी शिल्पा सुरेश जयकर

**डिप्लोमा (चाइल्डहूड केअर एज्युकेशन अँड ॲडमिनिस्ट्रेशन कोर्स)**
सौ. पूजा मंदार कोठारे, ८० टक्के,
विशेष गुणवत्ता

✳


**खास पाठारे प्रभूंचा ताशा**
मुंजी, लग्न, वरघोडा आणि
वरातीसाठी संपर्क:-
**श्री. मंगू ताशेवाला**
मोबाईल नं.:
९९२०५८२२६५/९९३०८३८६९९
पत्ता:
खोली क्र. ७, पहिला
मजला,(जयश्री मसाला वर),
बिल्डिंग नं. ६७/६९,
कामाठीपुरा ७वी गल्ली,
एम. आर. रोड, मुंबई-४००००८


हे मासिक मुद्रक, प्रकाशक श्रीमती सुहासिनी कीर्तिकर यांनी मालक बोर्ड ऑफ कंट्रोल प्रभुतरुण करिता मे. स्नेहेश प्रिंटर्स, ३२०-अ, शाह अँड नाहर इंडस्ट्रीयल इस्टेट, अ-१, धनराज मिल कंपाऊंड, सीताराम जाधव मार्ग, लोअर परेल, मुंबई-४०००१३ येथे छापून पारिजात बी-३, युनियन बँक एम्प्लॉईज को-ऑप. हौ. सोसायटी, पटेल इस्टेट, जोगेश्वरी (प.), मुंबई-४००१०२ येथे प्रकाशित केले.

**संपादक: श्रीमती सुहासिनी कीर्तिकर**

RNI NO. 14613/67